


# क्वॉण्टमचे एचडी ॲनालॉग डोम आणि बुलेट कॅमेरा

**ठळक वैशिष्ट्ये**

- ॲनालॉग हाय डेफिनेशन डोम कॅमेरा
- ६३६ आयआर एलईडी (१२ वीडीसी)
- ७३० मीटर्सपर्यंतची आयआर रेंज.

'क्वॉण्टम हाय टेक'ने इनडोअर व आऊटडोअर ॲप्लिकेशन्सकरिता एचडी ॲनालॉग कॅमेरे दाखल केले आहे. सुरक्षा आणि सर्व्हेलन्स क्षेत्रातील बदलत्या गरजांना ध्यानात घेऊन हे एचडी ॲनालॉग डोम आणि बुलेट कॅमेरे शासकीय, बँकिंग, शिक्षण, रिटेल व निर्माण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. क्यूडीआयएस - १एनडी३३३१ (डोम) आणि क्यूडीआयएस - १एमटी३२३१ (बुलेट) या उत्पादनांची किंमत अनुक्रमे ३२९५/- रुपये आणि ३८९५/- रुपये आहे. या उत्पादनांमध्ये अतिशय दीर्घ रेंज देऊ करणाऱ्या डब्ल्यूडीआर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे अपुऱ्या प्रकाशातही अचूक व सुस्पष्ट सर्व्हेलन्स मिळवणे शक्य होते. एखाद्या जागी एकाच वेळी प्रकाशाच्या स्थितीमध्ये बदल होत असेल अशा ठिकाणी सर्व्हेलन्स करणे अवघड असते. जसे की एखादे वाहन पार्किंग गॅरेज किंवा बोगद्यात प्रवेश करते तेव्हा. अशा वेळी बाहेरचा तेजस्वी प्रकाश आणि आतला अपुरा प्रकाश, अशा दोन प्रकारच्या प्रकाश स्थिती असतात.